iii) **सांडपाणी व्यवस्थापन-**

- सर्व सार्वजनिक ठिकाणी ( प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय ) तथा किमान ८० टक्के कुटुंबांकडे प्रभावीरीत्या सांडपाणी व्यवस्थापन असणे आवश्यक आहे. वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावरील शोष खड्डे, नाल्यांची कामे हाती घेऊन, सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत स्वयंपाक गृहातील आणि अंघोळीचे सांडपाणी/ पावसाचे वाहून जाणारे पाणी/ सेप्टिक टँक मधून प्रवाहीत होणारे Black water इ. चे व्यवस्थापन केलेले असावे.

iv) **गावाची दृष्यमान स्वच्छता-**

- गावातील सर्व सार्वजनिक ठिकाणी तथा ८० टक्के कुटुंबांकडे कमीत कमी कचरा निर्मिती व कमीत कमी साचलेले पाणी (stagenent water) आढळणे तसेच प्लॅस्टिक कचरा ढिगाऱ्यांची निर्मिती नसणे यावरून सदर गावातील दृष्यमान स्वच्छता निश्चित करावी.
  वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावरील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पूर्ण झालेली सार्वजनिक शौचालये, शाळा व अंगणवाडी स्वच्छता/शौचालय इ. चे Geo-tagging केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या SBM-Phase II च्या मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून करावे

**ब) गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) जाहीर करण्याची कार्यपद्धती:-**

- उपरोक्त " **अ** " मध्ये नमूद निकषांची पूर्तता करणारी गावे, हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) मानांकन प्राप्त करण्यासाठी पात्र असल्याबाबत स्वयंघोषणा करण्यासाठी, संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा/मासिक सभेचा त्याप्रमाणे ठराव असणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीने हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus ) म्हणून स्वयंघोषित केल्यानंतर सदर घोषणा , मोबाइल युजरने SBM phase II मोबाइल App वर सोबतचे **"प्रपत्र- ब "** अपलोड करावे.

**क) हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) घोषित केलेल्या गावांची पडताळणी प्रक्रिया:-**

हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) घोषित गावाची घोषणा, SBM-Phase II च्या मोबाईल ॲप्लिकेशनवर केल्यानंतर सदर गावाची संपूर्ण पडताळणी, गाव हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणून घोषित केल्यानंतरच्या ९० दिवसापर्यन्त राज्य स्तरावरून निश्चित करण्यात आलेल्या त्र्ययस्थ संस्थेमार्फत करावी. तथापि पडताळणीवेळी त्रयस्थ संस्था अस्तित्त्वात नसल्यास, खालील **"ड"** येथे नमूद केलेल्या समितीमार्फत गावाची संपूर्ण पडताळणी करावी. पडताळणी समितीने एका गावाची जास्तीत जास्त २ दिवसात पडताळणी पूर्ण करावी.

गावांच्या पडताळणी दरम्यान वरील समितीला काही त्रुटी आढळल्यास समितीने तसे अभिप्राय द्यावेत. सदर त्रुटींची पुर्तता संबधित गावाने १ महिन्याच्या आत करावी. संबधित गावाने त्रुटीची पुर्तता केल्यानंतर, सदर त्रुटींची पडताळणी, खालील **"ड"** येथे नमूद केलेल्या समितीमार्फत पुन्हा करून गावाने हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) च्या निकषांची पूर्तता केली असल्यास, सदर गावे हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) असल्याची माहिती, गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांना कळवावी आणि जिल्हा स्तरावरून उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांनी PM ०५ मधून अशा गावांची माहिती नोंदीत करावी.

**ड ) हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus ) पडताळणी समितीची रचना:-**

i) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा/तालुका/ग्रामस्तरीय अधिकारी व कर्मचारी यांची अथवा अशासकीय सदस्यांची समिती गठित करावी. सदर समितीमध्ये चार सदस्यांचा समावेश असावा. समिती सदस्यांमध्ये जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील अधिकारी / कर्मचारी / सरपंच / ग्रामपंचायत सदस्य / स्वच्छाग्रही / अंगणवाडी सेविका / आरोग्य कर्मचारी / महिला बचत गट / अशासकीय सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सूचित केलेले अन्य सदस्य असावेत. सदस्य अंतर्भूत करण्याचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील.

ii) गावाची हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus ) पडताळणी सुकर होण्याकरिता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी ज्या गावाची पडताळणी करावयाची आहे, त्या गावाच्या पडताळणी समितीमध्ये, उपरोक्त **ड) i)** येथे नमूद केलेल्या सदस्यांपैकी जिल्हा, तालुका स्तरावरील अधिकारी वगळता, अन्य सदस्य हे लगतच्या ग्रामपंचायती क्षेत्रामधील असावेत. ज्या गावाची पडताळणी करावयाची आहे, ते गाव, ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये येते, त्या ग्रामपंचायतीशी संबधित कोणत्याही शासकीय/ अशासकीय सदस्याचा, समावेश उपरोक्त ड) i) येथील पडताळणी समितीमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

iii) पडताळणी समितीस कोणत्याही प्रकारचे मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

iv) सदर समितीतील/संस्थेतील सदस्यांना हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) पडताळणी बाबत सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी सदस्यांना जिल्हा/ तालुका स्तरावरून प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षणाचा खर्च IEC घटका अंतर्गत मर्यादेत निधीतून करावा.

v) सदर समितीने /संस्थेने पडताळणी केल्यानंतर पडताळणीचा अहवाल स्वाक्षाकींत करून संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे सादर करावा. संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी सदरचा अहवाल जिल्हा स्तरावर सादर करावा.

vi) सदर प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षावर निश्चित करण्यात यावी.

vii) प्रत्येक गावाची हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) पडताळणी करताना, सोबतच्या "**प्रपत्र अ** " तसेच त्यासोबतच्या "**प्रपत्रे ड ते ऐ**" या नमुन्यानुसार पडताळणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२१०३१५१२५९१५८८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267728122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2021.03.15 17:32:26 +05'30'

**( चं. कृ. मोरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.सहसचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद सर्व.
१४.उपायुक्त (विकास), सर्व.
१५.उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन परिपत्रकाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.
१६.उप अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा उप विभाग सर्व
१७.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
१८. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.
१९.कार्यासन (पापु-१६),पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. (निवडनस्ती)

## प्रपत्र अ

### गाव हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)जाहीर करण्याची/पडताळणी सूची

| क्र. | मुद्दे | शेरा |
|---|---|---|
| १ | गावातील प्रत्येक कुटुंबाला कार्यरत शौचालयाची सुविधा उपलब्ध असून, त्याचा वापर करतात (वैयक्तिक/ सामुदायिक/ सार्वजनिक) | होय/नाही |
| २. | किमान एक वापरात असलेले सार्वजनिक शौचालय गावात आहे, यामध्ये महिला व पुरुषांकरिता स्वतंत्र शौचालय सुविधा आहे/नाही. | होय/नाही |
| ३. | सर्व शाळा/अंगणवाडी/ग्रामपंचायत कार्यालयांच्या ठिकाणी कार्यरत शौचालयाची सुविधा आहे आणि मुला मुलींसाठी /महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था आहे. (अंगणवाडी मध्ये शौचालय सुविधा नसल्यास अंगणवाडी शेजारील सार्वजनिक शौचालय / शाळेचे शौचालय/अन्य सुविधा उपलब्धा आहे /नाही.) | होय/नाही |
| ४ | सर्व सार्वजनिक ठिकाणी<br>१. कमीत कमी कचरा निर्मिती<br>२. कमीत कमी साचलेलेपाणी<br>३. प्लॅस्टिक कच-याचे ढीग न आढळणे | होय/नाही |
| ५ | सर्व प्राथमिळ शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय व गावातील किमान ८० टक्के कुटुंबांकडे विघटनशील कच-याचे व्यवस्थापन खालील माध्यमातून केले आहे.<br>१. सार्वजनिक/वैयक्तिक कंपोस्ट पीट<br>२. सार्वजनिक/वैयक्तिक बायोगॅस<br>३. अन्य व्यवस्था | होय/नाही |
| ६ | सर्व प्राथमिळ शाळा, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय व गावातील किमान ८० टक्के कुटुंबांकडे सांडपाणी व्यवस्थापन खालील माध्यमातून करण्यात आले आहे.<br>१. सार्वजनिक शोषखड्डे २. वैयक्तिक शोषखड्डे<br>३. स्थिरीकरण तळे ४. अन्य सुविधा | होय/नाही |
| ७ | गावात प्लॅस्टिक कचरा वर्गीकरण,संकलन व साठवण सुविधा आहे. | होय/नाही |
| ८ | खालील विषयांच्या बाबतीतील माहिती, शिक्षण व संवादाचे ( IEC) किमान ५ संदेश गावात दृष्यांकीत केले आहेत.<br>१. ODF शाश्वतता व शौचालयांचा नियमित वापर<br>२. हात धुण्यासाठी साबणाचा वापर<br>३. विघटनशील कच-याद्वारे खत निर्मिती<br>४. प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन<br>५. शोष खड्डयाच्या माध्यमातून सांडपाणी व्यवस्थापन | होय/नाही |

हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणून घोषित गावांची १००% टक्के पडताळणी, वरील **"ड"** मध्ये नमूद केलेल्या समितीमार्फत तसेच या शासन परिपत्रकासोबतच्या प्रपत्राप्रमाणे करण्यात यावी. तसेच हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) म्हणून घोषित गावांची यादृच्छिक ( Random Sampling ) पद्धतीने निवड करून, यागावातील ५% कुटुंबांची, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई यांनी तपासणी करावी.

## प्रपत्र ब- गावासाठी

### Self ODF Plus Declaration Format

### (Format as per SBM (G) Phase II Guideline Annexure-XI)

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

I, Shri/Shrimati-------------------------------------Sarpanch/ Upsarpanch /Pradhan /Mukhiya of ----------------------Gram Panchayat,-------- Block----------------District,-----------------State, and I,Shri /Shrimati --------------the Gram Panchayat Secretary, hereby certify that our Gram Panchayat/Village is now ODF-Plus (Open Defecation Free with solid and liquid waste management). This resolution was adopted during the Gram Sabha/Monthly Gram Panchayat meeting held on date --------------

| | |
|---|---|
| Signature of | Signature of |
| Sarpanch/Upsarpanch/Pradhan/Mukhiya | Panchayat Secretary |
| Name----------- | Name------------- |
| Date ----------- | Date ----------- |
| Official Seal | Official Seal |

## प्रपत्र क- जिल्हयासाठी

### ODF plus Declaration Format

### (Format as per SBM (G) Phase II Guideline Annexure-XI)

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

I,Shri/Shrimati ------------------------------------------District collector of -- -------------------------District,-----------------State, hereby certify on behalf of citizen and administration of-----------------District that our District isODF Plus(Open Defecation Free with Solid and Liquid waste Management) as on date-----------------

Signature

Name-------------

Official Seal---------------          designation-----------

## पत्र- ड

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------- तालुका------------ग्राम पंचायत--------

## शौचालय बांधकाम व वापर

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंब प्रमुखाचे नाव | कुटुंबातील एकूण सदस्य | शौचालय बांधकाम व सद्यस्थिती | | | पाण्याची सुविधा आहे /नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शौचालय उपलब्ध आहे /नाही | शौचालय नसल्यास शौचास कुठे जातात (उघड्यावर/दुस-याचे शौचालय वापरतात) | शौचालय असल्यास वैयक्तिक/सामूहिक/ सार्वजनिक/सामुदायिक या पैकी कोणते वापरतात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

## प्रपत्र- इ

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II--हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------- तालुका------------ग्राम पंचायत--------

## अंगणवाडी पडताळणी

| अ. क्र. | अंगणवाडी नाव | एकूण मुले | शौचालय सुविधा आहे / नाही | असल्यास | | | अंगणवाडी स्वत:च्या मालकीचे शौचालय नसल्यास कोणते वापरतात | नळा द्वारे पाण्याचीसुविधा आहे /नाही (नळा द्वारे नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शौचालय वापर आहे/नाही | शौचालयाचा मैला वाहक पाईप उघड्यावर सोडला आहे का ? होय/नाही | स्वच्छता असून वापर आहे/नाही | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

## प्रपत्र- ई

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------  तालुका-----------ग्राम पंचायत--------

शाळा पडताळणी

| अ क्र | शाळेचेनाव | एकूण मुले | शौचालय आहे/नाही | असल्यास | | | | शाळेचे स्वत:च्या मालकीचे शौचालय नसल्यास कोणते वापरतात | नळा द्वारे पाण्याचीसुविधा आहे /नाही (नळा द्वारे नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुला मुलींसाठी स्वतंत्र शौचालयसुविधा आहे /नाही | केवळ एक शौचालय आहे, मुता-या आहेत होय/नाही | शौचालयाचा मैला वाहकपाईप उघड्यावर सोडला आहे का ? होय/नाही | स्वच्छता असून वापर आहे/नाही | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

## प्रपत्र- उ

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------  तालुका-----------ग्राम पंचायत--------

सार्वजनिक शौचालय पडताळणी

| अ.क्र. | सार्वजनिक शौचालयाचे ठिकाण | शौचालय वापरणारी एकूण कुटुंबे | महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय सीट उपलब्ध आहे/नाही | नळाद्वारे पाण्याची सुविधा आहे/नाही | नळाद्वारे पाणी सुविधा नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? | स्वच्छता आहे/नाही | वापर आहे/नाही | देखभाल दुरूस्ती साठी उपाय योजना आहे/नाही | असल्यास कोणामार्फत केली जाते (ग्रा पं/माहिला बचत गट/सहा संस्था/लाभार्थी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

## प्रपत्र- ऊ

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------   तालुका------------ग्राम पंचायत--------

### गावातील सार्वजनिक ठिकाणे /आरोग्य सुविधांच्या ठिकाणी शौचालयसुविधा

| अ.क्र. | सार्वजनिक ठिकाणे | शौचालय सुविधा आहे/नाही | स्वच्छताआहे/नाही | नळाद्वारेपाणीसुविधा आहे/नाही | नळाद्वारे पाणी सुविधा नसल्यास अन्य कोणत्या मार्गे आहे ? | वापर आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

सार्वजनिक ठिकाणे- ग्राम पंचायत कार्यालय/अन्य शासकीय कार्यालये/संस्थेची कार्यालये/बाजाराची ठिकाणे /मंदिरे यांची नावे लिहावीत आणि प्रपत्राच्या अनुषंगे माहिती नमूद करावी

## प्रपत्र-ए.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------   तालुका------------ग्राम पंचायत--------

### घनकचरा व्यवस्थापन

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंब प्रमुखाचे नाव | सार्वजनिक/वैयक्तिक कंपोस्ट पीट च्या सुविधा आहेत/नाहीत | सार्वजनिक/वैयक्तिक बायोगॅस आहे/नाही | घनकच-याचे व्यवस्थापन केले आहे/नाही | सार्वजनिक/वैयक्तिक कंपोस्ट पीट च्या सुविधा आहेत/नाहीत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

# प्रपत्र-ऐ.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II-- हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus)पडताळणी

जिल्हा- ---------  तालुका------------ग्राम पंचायत--------

## सांडपाणी व्यवस्थापन

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंबप्रमुखाचेनाव | सांडपाण्यासाठी वैयक्तिक शोषखड्डयांच्या सुविधा आहेत | सांडपाण्यासाठी स्थिरीकरण तळ्याची सुविधा आहेत | सांडपाण्याचे व्यवस्थापन कसे केले आहे | सार्वजनिक शोषखड्डेच्या सुविधा आहेत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

## गोषवारा

टिप- सर्व गावाची पडताळणी केल्यानंतर खालीलमाहिती भरावी.

जिल्हा- --------तालुका--------ग्राम पंचायत ----------

### १. शौचालय बांधकाम व वापर

| अ.क्र. | एकूण गावे | एकूणकुटुंबे | पाहणी केलेली एकूण कुटुंबे | पैकी शौचालय असणारी एकूण कुटुंबे | उघड्यावर जाणारी एकूण कुटुंबे | किती कुटुंबांकडे नळा द्वारे पाणी सुविधा नाही | समितीचा अभिप्राय (गाव हागणदरी मुक्त अधिक आहे/नाही) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

### २. अंगणवाडी व शाळा पडताळणी

| अ. क्र. | एकूण प्राथमिक/ पूर्ण प्राथमिक (म्हणजे काय) शाळा | पैकी किती शाळांकडे मुलांसाठी आणि मुलींसाठी शौचालय आणि मुता-यांची सुविधा आहे. | किती शाळांकडे मुलांसाठीआणि मुलींसाठी शौचालय आणि मुता-यांची स्वतंत्र सुविधा नाही | किती शाळांकडे एक शौचालयआणि पुरेशा मुता-या आहेत | किती शाळांकडे नळा द्वारे पाणी सुविधा नाही | एकूण अंगणवाडी | पैकी किती अंगणवाडीकडे शौचालय सुविधा आहे | पैकी किती अंगणवाडी मध्ये शौचालय सुविधा नाही | किती अंगणवाडी कडे नळा द्वारे पाणी सुविधा नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

### ३. सार्वजनिक शौचालय पडताळणी

| अ.क्र. | एकूण सार्वजनिक शौचालये | पैकी वापरत असलेली सार्वजनिक शौचालये | नळा द्वारे पाणी सुविधा असणारी सार्वजनिक शौचालये | देखभाल दुरूस्ती साठी उपाय योजना असणारी सार्वजनिक शौचालये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

### ४. घनकचरा व्यवस्थापन

| अ.क्र. | एकूण कुटुंबे | पैकी किती कुटुंबांकडे सार्वजनिक पीट च्या सुविधा आहेत | पैकी किती कुटुंबांकडे वैयक्तिक कंपोस्ट पीट च्या सुविधा आहेत | किती कुटुंबांकडे वैयक्तिक बायोगॅस आहेत | किती कुटुंबांकडे घनकच-याचे व्यवस्थापन केलेले नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

### ५. सांडपाणी व्यवस्थापन

| अ.क्र. | एकूण कुटुंबे | पैकी किती कुटुंबांकडे सार्वजनिक शोषखड्ड्याच्या सुविधा आहेत | किती कुटुंबांकडे वैयक्तिक शोषखड्डेसुविधा आहेत | किती कुटुंबांच्या सांडपाण्यासाठी स्थिरीकरण तळ्याची सुविधा आहे | किती कुटुंबांकडे अन्य मार्गाने सांडपाण्याचे व्यवस्थापन केले आहे | किती कुटुंबांकडे सांडपाण्याचे व्यवस्थापन केले नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

### ६. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन वर्गीकरण व एकत्रिकरण

| प्लॅस्टिक कचरा वर्गीकरण सुविधा आहे/नाही | असल्यास प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन वर्गीकरण सुविधा असलेले ठिकाण | प्लॅस्टिक कचरा एकत्रिकरण सुविधा आहे/नाही | असल्यास प्लॅस्टिक कचरा एकत्रिकरण सुविधा असलेले ठिकाण | वर्गीकरण व एकत्रिकरण नसल्यास कारण नमूद करावे | वर्गीकरण व एकत्रिकरण नसल्यास प्लॅस्टिक व्यवस्थापन कसे केले जाते | ग्राम पंचायतीमध्ये घंटा गाडी आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

## ७. हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) माहिती, शिक्षण व संवाद ( IEC ) संदेश

| अ.क्र. | हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) माहिती, शिक्षण व संवाद ( IEC ) संदेश (ODF S/SLWM/Key Hygine Practice ) निदर्शनास आले/नाही | असल्यास ठिकाण कोणते | असल्यास कोणत्या विषयाचे IEC संदेश निदर्शनास आले |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

| |
|---|
| समितीचा अभिप्राय- |
| संपूर्ण ग्रामपंचायत हागणदारी मुक्त अधिक आहे |
| सर्व कुटुंबे शौचालयाचा वापर करतात |
| गावात कुठेही उघड्यावर मानवी विष्ठा आढळून आली नाही |
| गावात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या पुरेशा उपाय योजना आहेत |
| हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus) अनुषंगाने माहिती, शिक्षण व संवाद ( IEC ) चे ५ प्रकारचे संदेश निदर्शनास आले आहेत |

समिती अध्यक्षाचे नाव व स्वाक्षरी

समिति सदस्यांची नावे व  स्वाक्षरी

ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता सुविधांचा शाश्वत वापर व उर्वरीत उद्दीष्ट पूर्ण करण्याकरिता नियुक्त केलेल्या स्वच्छाग्रहीच्या नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०२१/प्र.क्र.६३५/पापु-१६

७ वा मजला,जी.टी. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक रोड, मंत्रालय, मुंबई-००१

तारीख: ३१ मार्च, २०२१.

वाचा -

१. शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र.६३५/पापु-१६,दिनांक-२०डिसेंबर, २०१८.
२. शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र.६३५/पापु-१६,दिनांक- ०५ जुलै, २०१९.
३. शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१८/प्र.क्र.६३५/पापु-१६,दिनांक- ०५ जानेवारी, २०२०.
४. पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर,नवी मुंबई यांचे क्र.पा.व स्व.स.सं./०४१९/प्र.क्र.२०/२०२०, दिनांक-१० एप्रिल,२०२० चे पत्र.

प्रस्तावना -

उपरोक्त वाचा १ येथील शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता सुविधांचा शाश्वत वापर व स्वच्छतेचे उर्वरीत उद्दीष्ट पूर्ण करण्याकरिता स्वच्छाग्रहीची नेमणूक करणे, नियुक्तीचे उद्दीष्ट, कर्तव्य व जबाबदारी, प्रोत्साहन रक्कम, पात्रता, निवड व इतर अनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या स्वच्छाग्रहीच्या नियुक्तीस उपरोक्त वाचा ४ येथील पत्रान्वये दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर स्वच्छाग्रहीच्या नियुक्तीस दिनांक ३० जून,२०२१ पर्यंत पुनःश्च मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

वाचा १ येथील शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता सुविधांचा शाश्वत वापर व स्वच्छतेचे उर्वरीत उद्दीष्ट पूर्ण करण्याकरिता स्वच्छाग्रहीची नेमणूक करणे, नियुक्तीचे उद्दीष्ट, कर्तव्य व जबाबदारी, प्रोत्साहन रक्कम, पात्रता, निवड व इतर अनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या स्वच्छाग्रहींच्या नियुक्तीस वाचा ४ येथील पत्रान्वये दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर स्वच्छाग्रहींच्या नियुक्तीस दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत पुन: श्च मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३३१११११६१२२६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2021.03.31 11:50:02 +05'30'

(स्मिता स. राणे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
६. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, सर्व विभाग,मंत्रालय, मुंबई.
८. सहसचिव तथा प्रकल्प संचालक,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष, सर्व.
१०.विभागीय आयुक्त, सर्व.
११.जिल्हाधिकारी, सर्व.

१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

१३.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद सर्व.

१४.उपायुक्त (विकास), सर्व.

१५.प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.

१६.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती/उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१८. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९.निवडनस्ती, पापु-१६.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-॥ अंतर्गत, सन २०२१-२२ या वर्षाकरिता जिल्हास्तरीय मॉडेल गोबरधन, तालुका स्तरीय स्केलिंग अप गोबरधन, क्लस्टर बेस गोबरधन व वैयक्तिक स्तरीय गोबरधन प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरिता, जिल्हास्तरीय समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :-स्वभामि २०२०/प्र.क्र.२०१ /पापु १६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०८/०४/२०२१.

वाचा

१) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-॥, अनुषंगाने. केंद्र शासनाने माहे जुलै २०२० मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

२) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक : S-१८०१७/१०/२०२०-SBM-III-DDWS, दिनांक १९/१०/२०२० व दिनांक १८/११/२०२०.

प्रस्तावना:-

संदर्भाधीन क्रमांक २ येथील केंद्र शासनाच्या दिनांक १८/११/२०२० च्या पत्रातील सूचना विचारात घेता, (जोडपत्र अ- संदर्भाधीन क्रमांक २ येथील केंद्र शासनाचे पत्र ) सन २०२१-२२ ते सन २०२२-२५ या कालावधीत, राज्यामध्ये सहकार तत्वावर आधारित पथदर्शी, जिल्हास्तरीय मॉडेल गोबरधन, तालुकास्तरीय स्केलिंग अप गोबरधन, क्लस्टर बेस गोबरधन व वैयक्तिक स्तरीय गोबरधन अशा प्रकारचे प्रकल्प, जिल्हा स्तरावर राबविण्यासाठी, प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व अनुषंगिक अंदाजपत्रकीय प्रस्तावांच्या मान्यतेसाठी, जिल्हास्तरीय तांत्रिक यंत्रणांना Empanelment करणेकामी मान्यता प्रदान करणे, याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली, संबधित विविध विभागातील अधिका-यांचा समावेश असलेली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

केंद्र शासनाचे उपरोक्त निर्देश विचारात घेता, सन २०२१-२२ ते सन २०२२-२५ या कालावधीत, राज्यामध्ये सहकार तत्वावर आधारित पथदर्शी, जिल्हास्तरीय मॉडेल गोबरधन, तालुकास्तरीय स्केलिंग अप गोबरधन, क्लस्टर बेस गोबरधन व वैयक्तिक स्तरीय गोबरधन अशा प्रकारचे प्रकल्प, जिल्हा स्तरावर राबविण्यासाठी,

प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व अनुषंगिक अंदाजपत्रकीय प्रस्तावांच्या मान्यतेसाठी, जिल्हास्तरीय तांत्रिक यंत्रणांना Empanelment करणेकामी मान्यता प्रदान करणे, याकरिता संबधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली, संबधित विविध विभागातील अधिका-यांचा समावेश असलेली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

### जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गोबरधन समिती.

| क्र. | पदनाम | समिती पदनाम |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, | सदस्य |
| ३. | जिल्हा कृषी अधिकारी, | सदस्य |
| ४. | जिल्हा उप निबंधक, सहकार विभाग. | सदस्य |
| ५. | उप संचालक, पशुसंवर्धन | सदस्य |
| ६. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व), जिल्हा परिषद. | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीमध्ये आवश्यकतेनुसार अन्य सदस्यांचा समावेश करण्याची मुभा, संबधित जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्ष यांना असेल.

**समितीची कार्यकक्षा:-**

१) गोबरधन कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी, गोबरधन योजनेकरिता जिल्हास्तरावर तांत्रिक यंत्रणा Technical Agency Empanel करण्यासाठी प्रक्रिया अवलंबवणे तथा Empanel झालेल्या तांत्रिक यंत्रणाना मान्यता देणे, गोबरधन प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या कच-याची उपलब्धता, प्रकल्पासाठीचे तंत्रज्ञान, प्रकल्प क्षमता याची निश्चित करणे

२) गोबरधन कार्यक्रम यशस्वी अंमलबजावणीसाठी, जिल्हास्तरावर गोबरधन प्रकल्प निश्चित करणे व अंतिम करणे, गोबरधन प्रकल्पांना अंतिम मान्यता प्रदान करणे.

३) प्रकल्पांचे कार्यान्वयन व सुलभ देखभाल दुरूस्तीची व्यवस्था निर्मिती अंतिम करणे.

४) केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या स्वभामि (ग्रा) अनुदानाशिवाय इतर कृतीसंगमे (Convergence) जसे MNRE इत्यादी सुनिश्चित करणे.

५) गोबरधन प्रकल्पाचे अंमलबजावणी यंत्रणा म्हणून, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांना, प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणी अनुषंगाने निर्देश देणे.

**समिती कार्यकाल:-**

सदर समिती दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत कार्यरत राहिल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२१०४०८१२५८५८८४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee11016571a4271090267228122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc9580fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2021.04.08 17:45:42 +05'30'

**(चं. कृ. मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सा.प्र.वि, महसूल व वन विभाग, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास, कृषी, ग्राम विकास, पर्यावरण, उर्जा व सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा / अध्यक्ष, सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

११. सहसचिव तथा अभियान संचालक (स्वभामि), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.

१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

१४. उपायुक्त (विकास), सर्व.

१५. संचालक, निरी/संचालक, मीत्रा-नाशिक /संचालक, नीरी-नागपूर/ संचालक, उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय.

१६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१८. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९. कार्यासन ( पापु-१६ ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. ( निवडनस्ती )

MOST IMMEDIATE

F.No.S-18017/10/2020-SBM-III
Government of India
Ministry of Jal Shakti
Department of Drinking Water & Sanitation
...

4th Floor, Pt. Deendayal Antyodaya Bhawan,
CGO Complex Lodhi Road,
New Delhi -110003.
Dated 18th November, 2020

To

Chief Secretaries,
Andhra Pradesh, Bihar, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, Uttar Pradesh, West Bengal

**Sub: GOBAR-Dhan 2020 'Waste to Wealth': A Unified Approach of Government of India**

**Sir/Madam,**

As you are aware, Department of Drinking Water and Sanitation is coordinating the implementation of GOBARDHAN 2020-21, a pilot programme for converting Waste to Wealth by converging all biogas programs of Government of India under various Ministries.

2. Secretary, DDWS had held a VC on 13.10.2020 with senior officers of your state to discuss GOBAR-DHAN-2020, subsequently, separate meetings have been held with all States involving various state departments such as Animal Husbandry, Cooperatives, Agriculture, Rural Sanitation and Panchayati Raj etc. to further discuss the steps required to be taken for implementation of the programme.

3. For cooperative-based cluster models, National Dairy Development Board (NDDB) under Department of Animal Husbandry & Dairying will be our technical partner. **Shri Meenesh C. Shah, Executive Director, NDDB will be the nodal officer for the project and may be contacted by email and phone at 9978445835 and meenesh@nddb.coop respectively.**

4. In this connection, urgent action needs to be taken on the following activities: -

(i) Formation of committee at state and district level.
(ii) Identification of Nodal Department.
(iii) Identification of districts/sites for taking up cooperative model.
(iv) Number of clusters and funding.
(v) Technical agency (ies) identified for DPR.

5. A list of recognized Gaushalas as provided by Department of Animal Husbandry & Dairying is enclosed for ready reference.

6. Since the time left for completion of the pilot project is very short, you are requested to kindly prepare an action plan for implementation of the project clearly indicating the targets for each of the activities as mentioned in para 4 above and furnish the same to this Department urgently

Yours faithfully,

(Arun Baroka)
Additional Secretary to Govt. of India
Ph: 011-24362192
Email: arun.baroka@nic.in

Copy to:

1. Addl. Chief Secy/Principal Secretary/Secretary, In charge of Rural Sanitation Andhra Pradesh, Bihar, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, Uttar Pradesh, West Bengal.

2. Mission Director/State Coordinator (SBM-G) Andhra Pradesh, Bihar, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, Uttar Pradesh, West Bengal

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- II अंतर्गत, राज्यस्तरीय पथदर्शी गोबरधन प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरिता, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :-स्वभामि २०२०/प्र.क्र.२०१/पापु १६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०८/०४/२०२१.

वाचा

१) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II, अनुषंगाने, केंद्र शासनाने माहे जुलै २०२० मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

२) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक : S-१८०१७/१०/२०२०-SBM-III-DDWS, दिनांक १९/१०/२०२० व दिनांक १८/११/२०२०.

प्रस्तावना:-

संदर्भाधीन क्रमांक २ येथील केंद्र शासनाच्या दिनांक १८/११/२०२० च्या पत्रान्वये, (जोडपत्र अ- संदर्भाधीन क्रमांक २ येथील केंद्र शासनाचे पत्र ) राज्यामध्ये सहकारी तत्वावरील पथदर्शी प्रकल्प (बनास काटा, गुजरात तत्वावरील) व सन २०२१-२२ ते सन २०२२-२५ या कालावधीत गोबरधन प्रकल्पांची राज्यस्तरीय अंमलबजावणी करणे, त्याअनुषंगाने, सदर प्रकल्पांसाठी आवश्यक असणा-या राज्यस्तरीय तांत्रिक यंत्रणांना Empanelment करणेकामी मान्यता प्रदान करणे, राज्यस्तरीय पथदर्शी प्रकल्पांच्या अंदाजपत्रकीय प्रस्तावांना मान्यता प्रदान करणे, याकरिता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली, गोबरधन संदर्भात प्रतिनिधीत्व असलेले राज्यातील विविध विभागातील अधिका-यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

केंद्र शासनाचे उपरोक्त निर्देश विचारात घेता, राज्यामध्ये सहकारी तत्वावरील पथदर्शी प्रकल्प (बनास काटा, गुजरात तत्वावरील) व सन २०२१-२२ ते सन २०२२-२५ या कालावधीत गोबरधन प्रकल्पांची राज्यस्तरीय अंमलबजावणी करणे,

त्याअनुषंगाने, सदर प्रकल्पांसाठी आवश्यक असणा-या राज्यस्तरीय तांत्रिक यंत्रणांना Empanelment करणेकामी मान्यता प्रदान करणे, राज्यस्तरीय पथदर्शी प्रकल्पांच्या अंदाजपत्रकीय प्रस्तावांना मान्यता प्रदान करणे याकरिता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली, गोबरधन संदर्भात प्रतिनिधीत्व असलेले राज्यातील विविध विभागातील अधिका-यांचा समावेश असलेली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

**मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील गोबरधन समिती.**

| क्र. | पदनाम | समिती पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२ | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग, मंत्रालय, | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव, दुग्ध व्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, | सदस्य |
| ९. | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई. | सदस्य |
| १०. | अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा:-**

१) गोबरधन कार्यक्रम यशस्वी अंमलबजावणीसाठी, राज्यस्तरीय पथदर्शी गोबरधन प्रकल्प निश्चिती करणे, प्रकल्प अंतिम करणे व प्रकल्पांना अंतिम मान्यता प्रदान करणे.

२) राज्यस्तरीय पथदर्शी गोबरधन प्रकल्पासाठी, राज्यस्तरीय सहाय्यकृत तांत्रिक यंत्रणा निश्चिती करणे.

३) केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या स्वभामि अनुदानाशिवाय इतर कृतीसंगमे (Convergence) जसे MNRE, १५ वित्त आयोग, सहकारी तत्वावरील दुग्धविकास संस्था/गौ-शाळा, इत्यादी यांच्या निधीची सांगड घालून प्रकल्पासाठी निधी नियोजन सुनिश्चित करणे.

४) राज्यस्तरीय पथदर्शी गोबरधन प्रकल्पाचे अंमलबजावणी यंत्रणा म्हणून, संबधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांना, प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणी अनुषंगाने निर्देश देणे.

**समिती कार्यकाल:-**

सदर समिती दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत कार्यरत राहिल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२१०४०८१२५९०१०४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219eab36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2021.04.08 17:38:39 +05'30'

**(चं. कृ. मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास, कृषी, ग्राम विकास, पर्यावरण, उर्जा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. सहसचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

१४. उपायुक्त (विकास), सर्व.

१५. संचालक, निरी/संचालक, मीत्रा-नाशिक /संचालक,नीरी-नागपूर/ संचालक, उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय.

१६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१८. संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

१९. कार्यासन ( पापु-१६ ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. ( निवडनस्ती )

'परिपत्र- ख'

MOST IMMEDIATE

F.No.S-18017/10/2020-SBM-III
Government of India
Ministry of Jal Shakti
Department of Drinking Water & Sanitation

4th Floor, Pt. Deendayal Antyodaya Bhawan,
CGO Complex Lodhi Road,
New Delhi -110003.
Dated 18th November, 2020

To

Chief Secretaries,
Andhra Pradesh, Bihar, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, Uttar Pradesh, West Bengal.

**Sub: GOBAR-Dhan 2020 'Waste to Wealth': A Unified Approach of Government of India**

**Sir/Madam,**

As you are aware, Department of Drinking Water and Sanitation is coordinating the implementation of GOBARDHAN 2020-21, a pilot programme for converting Waste to Wealth by converging all biogas programs of Government of India under various Ministries.

2. Secretary, DDWS had held a VC on 13.10.2020 with senior officers of your state to discuss GOBAR-DHAN-2020, subsequently, separate meetings have been held with all States involving various state departments such as Animal Husbandry, Cooperatives, Agriculture, Rural Sanitation and Panchayati Raj etc. to further discuss the steps required to be taken for implementation of the programme.

3. For cooperative-based cluster models, National Dairy Development Board (NDDB) under Department of Animal Husbandry & Dairying will be our technical partner. Shri **Meenesh C. Shah, Executive Director, NDDB will be the nodal officer for the project and may be contacted by email and phone at 9978445835 and meenesh@nddb.coop respectively.**

4. In this connection, urgent action needs to be taken on the following activities: -

(i) Formation of committee at state and district level.
(ii) Identification of Nodal Department.
(iii) Identification of districts/sites for taking up cooperative model.
(iv) Number of clusters and funding.
(v) Technical agency (ies) identified for DPR.

5. A list of recognized Gaushalas as provided by Department of Animal Husbandry & Dairying is enclosed for ready reference.

6. Since the time left for completion of the pilot project is very short, you are requested to kindly prepare an action plan for implementation of the project clearly indicating the targets for each of the activities as mentioned in para 4 above and furnish the same to this Department urgently

Yours faithfully,

(Arun Baroka)
Additional Secretary to Govt. of India
Ph: 011-24362192
Email: arun.baroka@nic.in

Copy to:

1. Addl. Chief Secy/Principal Secretary/Secretary, In charge of Rural Sanitation Andhra Pradesh, Bihar, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, Uttar Pradesh, West Bengal.

2. Mission Director/State Coordinator (SBM-G) Andhra Pradesh, Bihar, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, Uttar Pradesh, West Bengal

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत, ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, तालुका स्तरीय मासिक पाळी व्यवस्थापन व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन तसेच जिल्हा स्तरीय मैला गाळ व्यवस्थापन व गोबरधन तथा अनुषंगिक उपांगांच्या अंमलबजावणीसाठी, "महाराष्ट्र जीवन प्राधिकरण" स्तरावर तांत्रिक सहाय्य कक्ष स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :-स्वभामि २०२१/प्र. क्र. ६८ /पापु १६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १५/०७/२०२१.

वाचा :-

१. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा- II बाबत केंद्र शासनाच्या माहे जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचना.
२. शासन परिपत्रक क्रमांक :-स्वभामि २०२०/प्र. क्र. १९०/पापु-१६, दिनांक ०२/११/२०२०.
३. शासन परिपत्रक क्रमांक :-स्वभामि २०२०/प्र. क्र.११६ /पापु-१६, दिनांक २८/१०/२०२०, व दिनांक १४/०१/२०२१.

प्रस्तावना

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-II मध्ये वैयक्तिक/सार्वजनिकस्तरीय शौचालय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन मासिक पाळी व्यवस्थापन, प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट गोबरधन व मैला गाळ व्यवस्थापन ही कामे गाव, तालुका व जिल्हास्तरावर सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात हाती घेण्याचे नियोजन आहे. या बाबींच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक २ व ३ येथील शासन परिपत्रकान्वये सर्व समावेशक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-II मधील सर्व उपांगांची अंमलबजावणी, प्रभावी व तांत्रिक दृष्टया सुनियोजितपणे करण्यासाठी गाव, तालुका व जिल्हास्तरावर योग्य तंत्रज्ञान वापरून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-II ची विविध सर्व उपांगे कार्यरत करणे, क्षेत्रिय स्तरावर उपांगांच्या अंमलबजावणी संदर्भात तांत्रिक सहाय्य प्रदान करण्याची आवश्यकता आहे. यास्तव स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-II अंतर्गत क्षेत्रिय स्तरावर सर्व उपांगांकरिता तांत्रिक सहाय्य प्रदान करण्यासाठी, " महाराष्ट्र जीवन प्राधिकरण" यांच्या

आधिनस्त "राज्यस्तर व क्षेत्रियस्तर तांत्रिक सहाय्य कक्ष" स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-॥ मधील सर्व उपांगांची प्रभावी व तांत्रिक दृष्टया सुनियोजितपणे अंमलबजावणी करण्यासाठी गाव, तालुका व जिल्हास्तरावर योग्य तंत्रज्ञान वापरुन स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-॥ ची विविध सर्व उपांगांच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर तांत्रिक सहाय्य प्रदान करणेकामी, " **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**" यांच्या अधिनस्त राज्यस्तर व क्षेत्रिय स्तर तांत्रिक सहाय्य कक्ष स्थापन करण्यात येत आहे.

२. राज्यस्तरीय व विभागस्तरीय तांत्रिक सहाय्य कक्षाचा कार्यकाळ :-

संदर्भाधीन क्रमांक १ येथील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-॥ हा कार्यक्रम सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीत राबवावयाचे निर्धारीत केलेले असल्याने, सदर कक्ष सन २०२५ पर्यंत कार्यरत राहील. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या अभियानास केंद्र शासनाने भविष्यात मुदतवाढ दिल्यास, सदर मुदतवाढ कक्षास लागू राहील.

३. तांत्रिक सहाय्य कक्ष संरचना :-

अ) <u>राज्यस्तरीय तांत्रिक सहाय्य कक्षाची जबाबदारी व कर्तव्य :-</u>

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाशी तथा इतर मंत्रालयीन विभागांकडून तथा केंद्र शासनाकडून समन्वय साधण्यासाठी सदरचे कक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुख्यालय स्तरावरील मध्यवर्ती नियोजन व संकल्प चित्र हे कार्यालय असेल. या कक्षाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल :-

i) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-॥ उपांगांचे राज्यस्तरीय संनियंत्रण.

ii) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-॥ कार्यक्रमामध्ये उपलब्ध अनुज्ञेयतेच्या अधीन राहून, विविध उपांगांसाठी नाविन्यपुर्ण तंत्रज्ञानाची तांत्रिकदृष्ट्या समर्पकता लक्षात घेवून, सदरचे तंत्रज्ञान, गावांच्या विविध लोकसंख्येसाठी/गावसमुहांसाठी